RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# मूल्य शिक्षण : आवश्यकता व महत्त्व

**डॉ. विलास यशवंत रणसुरे**
सहयोगी प्राध्यापक
अध्यापक महाविद्यालय अरण्येश्वर, पुणे 9
E-mail : dr.vilasr@gmail.com

मानवाच्या व्यक्तिमत्वाचा संबंध बोलण्याशी नसून प्रत्यक्ष वर्तनाशी असतो. मानसशास्त्रदृष्टया मूल्यांचा संबंध व्यक्तिमत्वाच्या भावक्षेत्राशी आहे व या भावक्षेत्राचा विकास मानवी आदर्श व गुणवैशिष्टयातून होत असतो. आदर्शात्मक नैतिक मूल्यांचा संस्कार करण्यासाठी जे शिक्षण दिले जाते त्यास मूल्यशिक्षण म्हणतात. व्यक्तीला सामर्थ्यशील आदर्श माणूस बनविणारं शिक्षण म्हणजे मूल्यशिक्षण होय. लोकशाही मूल्यांचे रक्षण, सामाजिक, राजकीय, आर्थिक समतेचं संवर्धन, सर्व धर्माच्या सांस्कृतिक परंपरेतून आलेल्या चांगल्या गुणांचा, आदर्शाचा स्वीकार आणि समाज जीवनात या तत्वांच्या पालनासाठी व अनुकरणासाठी त्यांना कटिबध्द करणे म्हणजेच खरे मूल्यशिक्षण होय. कोणत्याही परिस्थितीत जी घडविता येतात व त्यांच्यात कधीही बदल होवू शकत नाही अशी शाश्वत नैतिक मूल्ये जीवनात रूजविणे याला मूल्य शिक्षण म्हणतात.

## मूल्यांचा अर्थ व स्वरूप

मूल्य म्हणजे काय ? 'मूल्य' या शब्दाचा व्यावहारिक अर्थ 'दर', 'किंमत' असा घेतला जात असला तरी आचारसंहितेच्या संदर्भात याचा वेगळा अर्थ घेतला जातो. 'मूल्य' या शब्दाला इंग्रजी भाषेत Value हा प्रतिशब्द आहे. अनेक तत्वज्ञांनी, विचारवंतांनी मूल्यांच्या वेगवेगळया व्याख्या केलेल्या आहेत.

- हेन्री ज्यूल्स – मूल्य म्हणजे ज्याला चांगले समजतो असे काहीतरी. उदाहरणार्थ – प्रेम, दयाळूपणा, समाधान, गंमत, प्रामाणिकपणा, सभ्यता, आराम व साधेपणा.
- श्री. प्रकाश समिती – मनुष्याच्या जीवनातील आवडीनिवडीनुसार प्रभाव गाजवून त्याच्या वर्तनावर नियंत्रण ठेवणारा घटक म्हणजे मूल्य.
- एखाद्याच्या शारीरिक किंवा मानसिक स्वास्थ्याला तसेच समाजहिताला आणि समायोजनाला उपयुक्त ठरणारी मार्गदर्शक जीवनतत्वे म्हणजे मूल्ये होत.
- जी दाखविता येणार नाहीत पण अंगी बाणविता येईल अशी नैतिकता म्हणजे 'मूल्ये' होय.

1986 च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शाळेत दिल्या जाणाऱ्या शिक्षणातून नैतिक मूल्य रूजविणे व समाजातून भ्रष्टाचार, अनाचार, हिंसाचार, अनैतिकतेचे स्तोम कमी करणे याकडे जास्त लक्ष दिल्याचे दिसते. त्यासाठी शाश्वत मूल्य शिक्षण देणे गरजेचे मानले. मूल्यशिक्षणाची सुरूवात इ.स. 1997–98 साली झाली असली तरी 1986 च्या शैक्षणिक धोरणातच दहा गाभा घटक व मूल्यांचा समावेश करण्यात आला होता.

शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे व विकासाचे महत्वाचे साधन असून त्यातून जीवनाच्या पार्श्वभूमीसाठीचे, मशागतीसाठीचे संस्कार विदयार्थ्यांवर झाले पाहिजेत. मूल्यशिक्षणातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाची घडण निश्चितपणे होईल. अनेक महापुरूष, थोर कलावंत, साहित्यिक, क्रांतीकारकांचे

आदर्श विद्यार्थ्यांसमोर ठेवता येतील. आपल्या गुणांचा, क्षमतांचा, ज्ञानाचा व कौशल्यांचा उपयोग आपल्या समाजासाठी करण्याची प्रेरणा मूल्य शिक्षणातून देता येईल.

इंग्रजांच्या अन्यायी – जुलमी राजवटीतून मुक्तता मिळवून देणाऱ्या महापुरूषांचे, देशभक्तांचे व क्रांतीला उत्तेजन देणाऱ्या ग्रंथांचे व गीतांचे स्मरण ठेवून त्यातून स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, स्वाभिमान, राष्ट्रवाद, राष्ट्राभिमान यांचे संस्कार विद्यार्थ्यांवर करता येतील. स्वतंत्र, संपन्न व समर्थ अशा देशाची जडण–घडण करण्याचा प्रयत्न प्रभावी शाश्वत व विश्वस्पर्शी मूल्यशिक्षणातून करता येईल. स्वातंत्र्यानंतरच्या अनेक क्षेत्रामध्ये आपण सुधारणा केली मात्र शिक्षणाच्या गुणात्मक वाढीत पिछाडीवर राहिलो. शिक्षणसंस्थांचे जाळे निर्माण झाले परंतु त्यातील गुणांचे मात्र पाळे झाले. या गुणात्मक वाढीसाठी मूल्यशिक्षणाची नितांत आवश्यकता आहे.

आपला देश हा गरीबांचा श्रीमंत देश समजला जातो. देशात अनेक दुःखीत, पिडीत, अपाद्ग्रस्त, गरीब, आश्रित, निरक्षर, अडाणी लोक आहेत. आपण सहानुभूतीने व सामाजिक सहिष्णुतेतून त्यांची दुःखे समजून घेतली पाहिजेत व ती दूर करण्याची जाणीव विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण केली पाहिजे. त्यासाठी मूल्य शिक्षणाची आवश्यकता आहे.

21 व्या शतकात मानवाने प्रवेश केला तो तो विज्ञान तंत्रज्ञानाला अंगभूत धरूनच, त्यामुळे हे शतक विज्ञान व तंत्रज्ञानाचे मानले जाते. नवनवीन शोधांमुळे वेगवेगळया क्षेत्रात अमूलाग्र बदल होवून नावीन्यपूर्ण रासायनिक व भौतिक वस्तू तयार झाल्या त्या भौतिक वस्तूंचा वस्तुनिष्ठपणे वापर करण्यासाठी व विज्ञानाला आत्मसात करण्यासाठी विचारांची वैज्ञानिक बैठक हवी. त्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोनाची आवश्यकता आहे. जरी विज्ञानाचा मानवी जीवनात प्रवेश झाला असला तरी समाजात रूढी – परंपरा, अंधविश्वास, अज्ञान, अडाणीपणा, भोळया समजुती अजूनही आहेत व हे अडथळे विकासमार्गात प्रभावी बनत आहेत. हे सर्व अडथळे दूर करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये सर्व पातळयांवर वैज्ञानिक दृष्टिकोन हे मूल्य रूजविणे आवश्यक आहे.

आपण ज्या देशात राहतो त्या देशाविषयी, देशातील लोकांविषयी, देशाची राष्ट्रीय प्रतिके, गीते, पक्षी, प्राणी, खेळ व देशातील लोकांची संस्कृती याविषयी विद्यार्थ्यांच्या मनात प्रेम, आस्था, कृतज्ञता असली पाहिजे. या भावनांचे संवर्धन शालेय जीवनापासूनच झाले तर ते फायदेशीर ठरते. सांस्कृतिक, भौतिक, आर्थिक अंगांनी राष्ट्राचा विकास होण्यासाठी राष्ट्रभक्ती हे एक प्रेरक जीवनमूल्य ठरते. जातीयता, भ्रष्टाचार इत्यादी लोकशाहीविरोधी घटकांची वाढ होवू नये म्हणून राष्ट्रभक्ती या मूल्याच्या संस्काराची गरज आहे.

आपला देश हा विविधतेने नटलेला देश आहे. अनेक जाती, धर्म, पंथ, वंश असलेले लोक येथे एकत्र नांदतात. आपल्या राष्ट्रीय प्रगतीसाठी स्थैर्य, शांतता, सुव्यवस्था या बाबी आवश्यक आहेत. विविध जातीजमाती, धर्म, पंथ असलेल्या भारतासारख्या देशात या सर्वांमध्ये सौहार्दाचे, सलोख्याचे व मैत्रीचे वातावरण असेल तरच स्थैर्य, शांतता, सुव्यवस्था या गोष्टी नांदू शकतील. त्यासाठी विदयार्थ्यांना सर्व धर्माची व त्या प्रत्येक धर्माची तत्वे, सार, नियम समजून सांगावेत. त्यातून धर्मसहिष्णुता हे मूल्य रूजविणे शक्य आहे. त्यासाठी विद्यार्थी जीवनात धर्मनिरपेक्षतेचे तत्व रूजवावे लागेल. त्यासाठी शिक्षकांची जबाबदारी अतिशय महत्वाची व निर्णायक ठरणार आहे.

भारतात प्राचीन काळापासून पुरूषप्रधान संस्कृती आहे. त्यामुळे स्त्रियांची वंचना होत आलेली आहे. स्त्रीचे कार्यक्षेत्र मर्यादित ठेवून तिचा कायिक, मानसिक, बौध्दिक विकास अवगुंठित केलेला आहे.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने स्थान मिळालेले नाही. स्वातंत्र्यलढयात व स्वातंत्र्यानंतर स्त्रियांनी महत्वपूर्ण व निर्णायक कामगिरी बजावली व त्यामुळे स्त्रियांची गुणवत्ता सिध्द झाली आहे. त्यामुळे स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने स्थान मिळालेले आहे. समाजातील अनिष्ठ रूढी, पंरपरा, अंधश्रध्दा यातून मुक्त होण्यासाठी स्त्री–पुरूष समानतेचे मूल्य रूजविणे आवश्यक आहे.

राष्ट्र, समाज विकासासाठी जशी विज्ञान तंत्रज्ञानाची आवश्यकता आहे तशीच व्यापार, उद्योगधंद्याची आवश्यकता आहे. त्यासाठी कामगार, श्रमिक यांची मनोभूमिका तयार करणे गरजेचे आहे. कुशल व अकुशल कामगार, उद्योगधंद्यांसाठी, पर्यायाने देशाच्या उन्नतीसाठी गरजेचे आहेत. त्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांच्या मनात कामाविषयी, श्रमाविषयी आपलेपणाची भावना निर्माण करणे गरजेचे आहे. या संदर्भात अण्णा भाऊ साठे म्हणतात,

**'पृथ्वी शेषनागाच्या मस्तकारवर तरलेली नसून**

**ती कामगार व श्रमिकांच्या तळहातावर तरलेली आहे.'**

हा संस्कार विद्यार्थी मनावर घडवून कोणतेही काम कमी प्रतीचे किंवा हलक्या दर्जाचे नसते हे त्यांना सांगितले पाहिजे. विद्यार्थ्यांना सर्व कामे सारखीच महत्वाची वाटली पाहिजेत. आपले काम आपणच केले पाहिजे हा संस्कार त्यांच्यावर रूजविला पाहिजे. त्यातून विद्यार्थ्यांना श्रमप्रतिष्ठा हे मूल्य कळेल. हे कळण्यासाठी श्रमप्रतिष्ठा मूल्य रूजविणे आवश्यक आहे.

अनेक व्यक्तींचा मिळून समाज बनलेला असतो. त्यामुळे जन्मल्यापासून ते मृत्यूपर्यंत आपणाला इतरांचे सहकार्य घ्यावे लागते. मानव हा समाजशील, समाजप्रिय प्राणी आहे. आपली अनेक कामे करताना आपल्याला इतरांचेही भान ठेवावे लागते. एखाद्याला सहज धक्का लागला तरी त्याला क्षमस्व म्हणावे लागते. एकमेकांना सहकार्य करून त्यांना अडचणीच्या वेळी सहकार्य करणे हा एक शिष्टाचार व सदाचार समजला जातो. दुःखित, पिडित, आश्रित, अपादग्रस्त लोकांना सहकार्य करण्याची मनोभूमिका निर्माण करणे गरजेचे आहे. याला सौजन्यशील व्यवहार म्हणतात. हे सौजन्यशीलतेचे मूल्य विद्यार्थीमनावर बिंबवणे गरजेचे आहे.

समाजात वाढलेला भ्रष्टाचार, अनैतिकता, व्यवहारवाद, यामुळे समाज हिंस्त्र बनत आहे. समाजातील विवेकता, नैतिकता रसातळाला गेली असून समाज संवेदनशून्य बनला आहे. दररोजच्या वर्तमानपत्रातून व बातम्यांतून समाजातील दांभिकपणा, विवेकशून्यता व स्त्रियांवरील अत्याचार, खून, मारामारी, चोऱ्या, लुबाडणूक, विनयभंग, अश्लिलता यांचे दर्शन होते. त्यामुळे समाजातील निच्चतम संस्कार दिसतात. या सर्वांमध्ये बदल करणे गरजेचे आहे. त्यातून भावी पिढी घडविणे आवश्यक आहे. त्यासाठी समाज भावनाशील, संवेदनाक्षम बनवायला हवा. हा संवेदनशिलतेचा संस्कार विद्यार्थ्यांवर घडविणे आवश्यक आहे.

'नियोजनाशिवाय मिळालेले यश हा केवळ योगायोग समजावा'. कारण नियोजनाशिवाय यश मिळत नाही. मानवाला वेळेच्या आधी व वेळेच्या नंतर कोणतीही गोष्ट मिळत नाही हे सत्य आहे. त्यासाठी छोटया – मोठया कामाचे नियोजन करावे. वेळेची मर्यादा घालून घ्यावी. वेळच्या वेळी झालेल्या नियोजित कामामुळे एक वेगळया प्रकारचे समाधान मिळते. असे समाधान वारंवार मिळाले तर उच्च आनंदप्राप्ती होते. त्याची सवय होते व वक्तशीरपणा येतो. कोठेही जाताना, येताना वेळेचे भान ठेवले जाते. वेळीच हाती घेतलेले काम पूर्ण झाले तर आत्मविश्वास वाढतो. हा आत्मविश्वास वाढण्यासाठी वक्तशीरपणा हे मूल्य रूजविणे आवश्यक आहे.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

'स्वच्छता हेच सौंदर्याचे खरे प्रतिक आहे' हे विधान वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छतेसाठी आवश्यक आहे. त्यातून सौंदर्यानुभव मिळत असतो. वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छता आणि व्यक्तीमधील स्नेहसंबंध यांच्या निर्मळ स्वरूपासाठी नीटनेटकेपणा हे मूल्य आवश्यक आहे. आपल्या अवती भोवतीचा परिसर स्वच्छ व निर्मळ ठेवल्याने वातावरण प्रसन्न व आनंदी राहते. त्यामुळे नीटनेटकेपणा हे मूल्य रूजविणे आवश्यक आहे.

## संदर्भ

1. नागतोडे किरण – नैतिक मूल्यशिक्षण, विदया प्रकाशन, नागपूर, 02
2. रणसुरे विलास – मराठी शिक्षण व आशययुक्त अध्यापन, संघमित्रा प्रकाशन, मिरज.
3. रणसुरे विलास – इतिहास शिक्षण, संघमित्रा प्रकाशन, मिरज.
4. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1986 – गाभा घटक परिचय, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे 4